मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या "कार्यवाही" व "अंमलबजावणी" चा आढावा घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र.मुसका-२०१७/ई- २५६३५४०/का.१,
मुख्य सचिव कार्यालय,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : १५ सप्टेंबर, २०१७.

वाचा : १) शासन निर्णय, सा.प्र.विभाग/मुख्य सचिव कार्यालय, क्रमांक: मंमंप्र-२०१४/ई-११०१२/६/का.१, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१४.
२) शासन परिपत्रक, सा.प्र.विभाग/मुख्य सचिव कार्यालय, क्रमांक: मुसका-२०१५/ई-१५२९८२/का.१, दिनांक २४ जुलै, २०१५.

शासन परिपत्रक

मंत्रिमंडळ प्रस्ताव सत्वर सादर करण्यासंदर्भात अंमलबविण्याची कार्यपध्दती व कालमर्यादेसंदर्भात संदर्भीय (१) येथील शासन निर्णयान्वये मंत्रालयीन सर्व विभागांना आवश्यक ते निदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार मंत्रिमंडळ निर्णयासंदर्भातील अंमलबजावणीची माहिती विहित प्रपत्रात या कार्यालयास सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, मंत्रिमंडळ बैठकीतील घेतलेल्या निर्णयाबाबत मंत्रालयीन विभागांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विहित वेळेत प्राप्त होत नसल्याने मंत्रिमंडळाने तीव्र नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे यासंदर्भात संदर्भीय (२) येथील शासन परिपत्रकान्वये आवश्यक त्या सूचना सर्व मंत्रालयीन विभागांना देण्यात आल्या आहेत.

२. मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय झाल्यानंतर संदर्भीय (१) येथील शासन निर्णयासोबतच्या विहित प्रपत्रात संबंधीत मंत्रालयीन कार्यवाहीची माहिती घेऊन मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात येते. मंत्रिमंडळ निर्णयानुसार आवश्यक ते शासन निर्णय/अधिसूचना/अध्यादेश इ. संबंधित मंत्रालयीन विभागांकडून काढण्यात येतात. तथापि, मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली आहे किंवा कसे, हे मंत्रिमंडळास अवगत होत नाही. त्यामुळे या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करण्याचे मा. मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिले आहेत. यास्तव मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत:-

१) मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयासंदर्भात संदर्भीय (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे विहित वेळेत मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यासाठी केलेल्या "<u>कार्यवाहीचा अहवाल</u>" सोबतच्या जोडलेल्या विहित **<u>प्रपत्र-अ</u>** मध्ये या कार्यालयास सादर करण्यात यावा. (या प्रपत्रात कार्यवाही म्हणजे मंत्रिमंडळ निर्णयानुसार शासन निर्णय निर्गमित करणे अथवा नियम/कायदा दुरुस्ती इ. बाबी करणे अभिप्रेत आहेत.)

२) मंत्रिमंडळाच्या निर्णयाच्या अनुषंगाने संबंधीत मंत्रालयीन विभागाने शासन निर्णय/ अधिसूचना/ अध्यादेश इत्यादी निर्गमित केल्यानंतर या निर्णयाची प्रत्यक्षात निर्णयाची अंमलबजावणी झाली आहे किंवा कसे याबाबतचा " **अंमलबजावणी आढावा** " आगामी मंत्रिमंडळात सादर करण्यासाठी सोबत जोडलेल्या **प्रपत्र-ब** मध्ये या कार्यालयास सादर करावा. (या प्रपत्रात प्रत्यक्ष क्षेत्रिय स्तरावर झालेल्या **अंमलबजावणी** बाबत माहिती देणे अपेक्षित आहे.)

३. वरीलप्रमाणे दोन्ही प्रपत्रांमध्ये माहिती संदर्भाधिन शासन निर्णय व शासन परिपत्रकात नमूद वेळापत्रकानुसार मुख्य सचिव कार्यालयाकडे न चुकता सादर होईल, याबाबत संबंधित विभागांचे सचिव यांनी कृपया दक्षता घ्यावी.

४. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संगणक संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१७०९१६१३०४२१२१०७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Sumit Mullick
Date: 2017.09.16 13:17:49
+05'30'

(सुमीत मल्लिक)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव / सचिव
३. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. निवड नस्ती (का.१)

सामान्य प्रशासन विभाग, मुख्य सचिव कार्यालय, शासन परिपत्रक क्र.मुसका-२०१७/ई- २५६३५४०/का.१, सोबतचे " प्रपत्र-अ "

शासन निर्णय, सा.प्र.विभाग/मुख्य सचिव कार्यालय, क्रमांक: मंमंप्र-२०१४/ई-११०१२/६/का.१, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१४ नुसार मंत्रिमंडळ बैठकीत सादर करावयाच्या कार्यवाहीचा अहवाल .

(शासन निर्णय निर्गमित करणे/नियम दुरुस्ती इ. संदर्भात)

अ.क्र.	बैठकीचा दिनांक व विषय क्रमांक	विषय	संबंधित विभाग	शासन निर्णयाचा क्रमांक व दिनांक/नियम दुरुस्ती इ. संदर्भातील तपशिल	कार्यवाही पूर्ण/अपूर्ण	कार्यवाही अपूर्ण असल्यास विलंबांची कारणे.
१	२	३	४	५	६	७

सामान्य प्रशासन विभाग, मुख्य सचिव कार्यालय, शासन परिपत्रक क्र.मुसका-२०१७/ई- २५६३५४०/का.१, सोबतचे " प्रपत्र-ब "

मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने प्रत्यक्षात केलेल्या
"अंमलबजावणीचा अहवाल"

अ.क्र.	बैठकीचा दिनांक व विषय क्रमांक	विषय	संबंधित विभाग	शासन निर्णयाचा क्रमांक व दिनांक	अंमलबजावणी/ भौतिक प्रगती पूर्ण झाली असल्यास त्याचा तपशिल	अंमलबजावणी /भौतिक प्रगती अपूर्ण असल्यास सद्य:स्थिती	अमंलबजावणी न होण्याची /विलंबाची कारणे.
१	२	३	४	५	६	७	८